# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

E Mail-1)desk15dte@gmail.com 2) System@dte.org.in 3) Desk15@dte.org.in


परिपत्रक

क्रमांक:१५/तंशिसं/अर्थस/निर्वाहभत्ता -ऑनलाईन /२०१६-१७/१५५

दिनांक : 17 NOV 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय:-"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७**
**(संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे)**

संदर्भ :-१) उ. व तं.शि. विभागाचे शासन निर्णय क्र. टीईएम२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३ ऑक्टो., २०१६.

उपरोक्त विषयास अनुसरुन खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये/ तंत्रनिकेतने (खाजगी अभिमत /स्वयं अर्थ सहाय्य विद्यापीठे वगळून) आणि शासकीय, शासन अनुदानित व शासकीय विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतनामधील (शासकीय अभिमत विद्यापीठांसह) डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत प्रमाणित केल्याप्रमाणे अल्पभुधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजुर आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता लागू राहील असे नमुद केले आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असणा-या खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित , शासकीय, अनुदनित अभियांत्रिकी महाविद्यालये / तंत्रनिकेतने संस्थातील अभ्यासक्रमाच्या वरील निकषांची पुर्तता करण्याऱ्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी राज्यातील महानगरातील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपुर) प्रवेशित आहेत, त्या विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी प्रतिमहा रू. ३०००/- व राज्यातील अन्य ठिकाणी असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रतिमहा रू. २०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता देण्यास मान्यता आहे. तसेच निर्वाह भत्ता हा शैक्षणिक वर्षातील सुट्टीचा कालावधी वगळून उर्वरित १० महिन्यांच्या कालावधी करिता अनुज्ञेय असेल. सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर तंत्रशिक्षण संचालनालयाच्या **www.dtemaharashtra.gov.in/ebc2016** या सकेत स्थळावर विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरीता भरलेल्या अर्जाचा Application ID वापर करून वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेची विद्यार्थ्यांने माहिती भरावयाची आहे.

विद्यार्थ्यांचे अर्ज व आवश्यक ती शैक्षणिक कागदपत्रे महाविद्यालये/तंत्रनिकेतने/विद्यापीठांनी व्दिप्रतीत उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. त्यासाठी सर्व सूचना/परिपत्रक संबंधीत संस्थांनी/विद्यापीठांनी सूचना फलकावर दर्शनी भागात ठळक व व्यापक स्वरुपात प्रसिध्द करावेत. तसेच सदरहू सूचना विद्यार्थ्यांना वर्गामध्ये शिक्षकांमार्फत दयावी. संस्था/ महाविद्यालय/ विद्यापीठ मधील कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची

दक्षता संस्थेच्या /महाविद्यालयाच्या/ विद्यापीठाच्या प्रमुखांनी घ्यावी. जर विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या/महाविद्यालयाच्या/ विद्यापीठाच्या प्रमुखांची राहील. संगणक प्रणालीवर विषयांकित संस्था, महाविद्यालये व विद्यापीठ मधील विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीमध्ये ऑनलाइन अर्जाची माहिती दि. १७ नोव्हेबर २०१६ ते ५ डिसेंबर २०१६ पर्यंत भरण्यात यावी. तसेच सस्थांनी अर्जाची संपुर्ण छाननी करून आकडेवारी विद्यार्थ्यांच्या अर्जासह अहवाल सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना दि.१५ डिसेंबर २०१६ पर्यंत सादर करावे. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी प्राप्त अर्जाची छाननी विभागीय कार्यालय स्तरावर समिती गठीत करून अहवाल या तत्रशिक्षण संचालनालयास दि.२२ डिसेंबर २०१६ पर्यंत सादर करण्यात यावा.

उपरोक्त योजनेची अंमलबजावणी विहित नमुद कालावधीत करावी. याबाबतीत मुदतवाढ देण्यात येणार नाही यांची नोंद घेण्यात यावी. व सदर योजनेबाबत शासन आदेशातील व तंत्रशिक्षण संचालनालयाने दिलेल्या सुचना / निर्देशाचे काटेकोरपणे पालन करावे. आपल्या स्तरावरून संस्थाना सुचित करावे. अशा सूचना आपल्या स्तरावरुन खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनासमवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/शासकीय विद्यापीठ यांना देण्यांत याव्यात.

उपरोक्त योजनेसाठी विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने विभागीय कार्यालये/अधिनस्त संस्थांना/विद्यापीठे यांना अडीअडचणी उद्‌भवल्यास **ebc@dtemaharashtra.gov.in** या E-mail (इमेल) व दूरध्वनी क्रमांक ०२२ ३०२३३४६८/ ४३८ यावर संपर्क साधावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- प्रणाली विश्लेषण तथा समन्वयक, कार्यासन क्रमांक -३, मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता

क्र. तंशिसं/विकाना/ईबीसी-निर्वाहभत्ता/२०१६/ 3217
दिनांक : 21 NOV 2016

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित तसेच शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने व शासकीय विद्यापीठे पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच पदविका संस्था.
नागपूर विभाग, नागपूर

उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार **डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना** शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्तीबाबत पत्रात नमूद केल्यानुसार मागदर्शन करण्यांत यावे. तसेच संस्थांनी सुचना फलकावर दर्शनी भागात ठळक व व्यापक स्वरुपात प्रसिध्द करावेत. तसेच सदरहू सुचना विद्यार्थ्यांना वर्गामध्ये शिक्षकांमार्फत देण्यांत यावी. सदरहू योजनेकरीता कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची संस्था प्रमुखानी दक्षता घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर